३८ मे २०२१

NOVEMBER 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

SATURDAY

WEEK 41

DAY 283-082

DATE 10.10.2015

10 OCTOBER

ॐ श्री परमात्मने नमः।

अथ पञ्चदशोऽध्यायः।

अन्तःपूर्णः बहिःपूर्णः पूर्णकुम्भ इवार्णवे।
अन्तःशून्यः बहिःशून्यः शून्यकुम्भ इवाम्बरे॥

कुंभ जर सागरात बुडवला तर तो हळूहळू पण पूर्णपणे काठोकाठ भरतो. त्याच्या आत-बाहेर, वर खाली पाण्याने भरून जातो. पूर्णता हेच त्याचे स्वरूप होऊन जाते. त्याला 'पूर्णकुम्भ' असे म्हणतात. कुंभाला स्वतःचा एक आकार असतो. अर्थातच त्यामुळे त्याला मर्यादा येतात. मात्र महासागराला मर्यादा नाही. तो अमर्याद आहे. तो अंतर्बाह्य परिपूर्ण आहे.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।

अशा परिपूर्ण, अथांग सागरामध्ये एक छोटासा रिकामा कुंभ बुडवला तर तो सागरापासून पूर्ण भिन्न असूनही सागर त्या कुंभाचा ठाव घेतो. अंतर्बाह्य व्याप्त करतो आणि मग तो कुंभ पूर्णकुंभ होऊन जातो.

त्याच प्रकारे एखादा रिकामा कुंभ आकाशात ठेवला तरी तो आत-बाहेर आकाशानेच व्याप्त होऊन जातो. पूर्णता ही बाहेरगाने अनुभवता येणारी गोष्ट नाही. किंवा स्थिती नाही. या विश्वामध्ये प्रत्येक वस्तूला मर्यादा आहे. आणि जी वस्तु मर्यादित असते, ती कधीच पूर्ण नसते, व्यापक नसते. कारण पूर्णता म्हणजे व्यापकता. अर्थातच सर्व मर्यादांच्या अतीत असलेली वस्तु! थोडक्यात सर्वव्यापकता हेच पूर्णतेचे स्वरूप आहे.

पंचमहाभूते ही एकापेक्षा एक अधिक सूक्ष्म, तरल होत जातात. तसतशी व्यापक होत जातात. आपल्या अनुभवाच्या कक्षेत येणारे आकाश व्यापक आहे.

वस्तूला तीन प्रकारच्या मर्यादा — देश-काल-वस्तु Space, Time, Objectivity - विश्व सापेक्षित आहे. मर्यादित आहे. यत् कृतकम् तत् अनित्यम्।

यद् अल्पम् तद् मर्त्यम्। यद् मर्त्यम् तद् दुःखम्॥



© www.madhaveeraghuveer.com

जे जे निर्माण झाले आहे ते काळाच्या मर्यादेत येते आणि काळ सर्व वस्तूंना निर्माण करतो व नाशही करतो आणि नाशिवंत वस्तू दुःखाला, बंधनाला कारण होतात विश्व आणि वस्तू त्यांचे विषय हे निर्मित आहेत आणि म्हणून मर्यादित नाशवंत आहेत. या विश्वातील एकही वस्तु परिपूर्ण नाही.

त्यामुळेच मनुष्य मर्यादित वस्तूंवर प्रेम करत नाही, तर तो पूर्णतेवर प्रेम करतो. प्रत्येक जीव पूर्णतेसाठी प्रयत्न करत असतो. सर्वांची धाव पूर्णतेकडे असते. पूर्णता हेच प्रत्येकाचे अंतिम साध्य आहे. म्हणूनच --

असतो मा सद्‌गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय॥

ही प्रार्थना केली जाते. प्रत्येकाला मी अपूर्ण, असंतुष्ट असल्याची जाणीव असतेच. माणसाच्या जीवनात काही तरी कमी असते. उणे असते, अपुरे असते. काहीतरी मिळवायचे असते. आदर्शापर्यंत पोहोचायचे असते. भगवंत परिपूर्ण आहेत. ते सांगतात --

मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।

बिंदूला सिंधूची, अंशीच जीवाला शिवाची ओढ असते. अंतर्बाह्य परिपूर्ण व्हायचे असते. म्हणूनच पूर्णता हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. मात्र ही पूर्णता बाहेर मिळत नाही. तर ती आपल्याच अंतरंगामध्ये शोधून प्राप्त करण्याची स्वरूपस्थिती आहे.

करी सुखसंवाद जो उगमाचा॥
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

विचारी मना तूचि शोधून पाहे।

आणि पूर्णत्वाची कल्पना करता येत नाही. जिथे कल्पना आहे तिथे मर्यादा असते. पूर्णता नसते. त्यामुळे पूर्णता ही काल्पनिक नाही.

…ना। कल्पना कल्पिता कल्पकोटी।



©www.madhaveeraghuveer.com

पुर्णता हेच जीवनाचे सत्य आहे. ती अंतरंगाची सहज स्वाभाविक अवस्था आहे.

स्वतः पूर्ण असलेला महासागर जसा कुंभाला अंतर्बाह्य पूर्ण भरू शकतो. तसाच पुर्णत्वाने असणारा परमेश्वर मनुष्याचे अंतःकरण परिपूर्ण भरू शकतो. ज्यापर्यंत मनुष्य पुर्णतेचा साधक आहे त्यापर्यंत तो पूर्ण नाही. परंतु एकदा का त्याचे अंतःकरण पुर्णतेने भरून जाते तेव्हा त्याच्या सर्व इच्छा, आकांक्षा, कामना, वासना गळून पडतात. तो स्वतः पूर्ण झाल्यावर त्याला पुर्णतेची ओढ रहात नाही. तो निर्वासन होऊन जातो.

I want nothing. I expect / desire nothing— त्याच्या सर्व कामना गळून पडतात.

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।

पुर्णता ही अंतरंगाची स्थिती त्याला प्राप्त होते. मी पूर्ण आहे. मी तृप्त आहे ही साक्षात अनुभूती येते.

आत्मन्येव च सन्तुष्टः तस्य कार्यं न विद्यते ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥

आपल्यालाही या स्थितीपर्यंत जायचे असेल तर कसे पोहोचणार? हृदय अंतर्बाह्य पुर्णतेने कसे भरणार?

तर त्यासाठी तो कुंभ रिता करायला हवा---- हृदय मोकळे करायला हवे. अनावश्यक आहे ते टाकून द्यायला हवे. त्यासाठी बाहेर शोध घ्यायचा नाही तर तो शोध अंतरंगात घ्यायचा आहे.

दुसऱ्याचे दोष पहाण्यापेक्षा स्वतःमधील उणिवा शोधायला हव्यात. जे दोष आपल्याला जगामध्ये दिसतात ते खरे तर मुळात आपल्यातच असतात- आपल्या अंतःकरणात अनेक दोषांनी ठाण मांडले आहे. राग-द्वेष, काम-क्रोध, दंभ, दर्प, असूया, ईर्षा, मत्सर स्वार्थ-लोलुपता, विकल्प, संशय, वैर असे अनेक---- आणि ते खोलवर रुजले आहेत. ते पुन्हा पुन्हा डोके वर काढतात. मनात विक्षेप, नैराश्य निर्माण झाले की

© www.madhaveeragnuveer.com

मनःशांति हरवून जाते. पायात घुसलेला लहानसा काटा अत्यंत वेदना देतो. इथे तर हृदयात हे असंख्य रिपु थैमान घालत आहेत. त्यामुळे सतत यातना होतात. शांति, सुखाची निद्रा हिरावून घेतली जाते. त्यामुळे जीवन असह्य, अशांत होऊन जाते. त्यासाठी हे सर्व दोष जाणकाराच्या नजरेने निवडून बाहेर टाकले पाहिजेत.

पांढऱ्याशुभ्र तांदळातले गारेचे खडे वरवर दिसत नाहीत. पण ते मोठी हानि करतात---

हे सर्व दोष एकवेळ जातील. पण जाता जात नाही तो 'अहंकार'! हा महाभयंकर शत्रूच माणसाला पूर्णतेपासून वंचित ठेवतो. याचाच मोठा प्रतिबंध आहे. तो जेव्हा गळून पडेल तेव्हा मनुष्याला पूर्णता प्राप्त होईल. पण तो सहजासहजी हटायला लागत नाही ---

अत्यंत कडाक्याच्या थंडीमध्ये सागरामध्ये हिमनग निर्माण होतो. पाण्यातूनच निर्माण झाला असला तरी त्याला एक विशिष्ट आकार असतो. तो जितका बाहेर दिसतो त्यापेक्षा कितीतरी पटीने तो खोल रुजलेला असतो. वास्तविक तो पूर्णतेतूनच निर्माण झालेला पूर्णतेच्या महासागरात अस्तित्व असलेला असा असतो. पूर्णता हेच त्याचे स्वरूप असले तरी तो स्वतःला मर्यादित, भिन्न समजतो. हा भेद 'मी' ने निर्माण केला आहे. म्हणून जोपर्यंत अहंकार आहे, हिमनग आहे तोपर्यंत तो महासागराशी एकरूप होणार नाही. त्यासाठी तो वितळला पाहिजे. मर्यादांचा त्याग करायला हवा. भेद संपायला हवा. तरच तो सागराशी एकरूप होईल. त्यासाठी या हिमनगाला सूर्यप्रकाश मिळायला हवा. सूर्याशी संयोग झाला की अहंकार गळून पडेल. मग ममकारही गळून पडेल. हे कधी होईल तर जेव्हा सद्गुरूंची भेट होईल. कृपा होईल. ते आत्मबोधाचा उपदेश करतील. त्यांच्या दोष, इच्छा, उपाधि गळून पडतील व मग तो अंतर्बाह्य परिपूर्ण होऊन जाईल---

शिष्याच्या हृदयामध्ये ज्ञानरूपी सूर्याचा उदय झाला की तो आत्मसंतुष्ट होतो. मग पूर्णता ही केवळ अनुभूति न राहता ते त्याचे स्वरूप बनून जाते.

आनंदाचे डोही आनंद तरंग।
आनंदाचे अंग आनंदाचे ॥

सागरामध्ये अथांग, अपार, विशाल, निरतिशय अशा आनंदाच्या उर्मी उसळत राहतात. आणि त्यात तो आकंठ डुबलो आनंदस्वरूप होतो. ही स्थिती म्हणजे पार पूर्णता.

ही स्थिती म्हणजे 'पुरुषोत्तम अवस्था'!

पुरुषोत्तम म्हणजे एक व्यक्ती नाही. एक देह नाही. तर पूर्णता म्हणजे पुरुषोत्तम! आणि त्याच्या प्राप्तिमुळेच जीवन पूर्ण होते आणि म्हणून ओढ हवी ती पूर्णतेची, पुरुषोत्तमाची! त्या दिशेनेच सर्व जीव धावत असतात. विषय, सत्ता, संपत्ती हे साध्य असू नये तर पूर्णतेमध्ये एकरूप होणे हे आपले उद्दिष्ट असायला हवे. ती पूर्णता प्राप्त करण्यासाठी हे शरीर मिळाले आहे. एक अमूल्य संधी मिळाली आहे. त्याचे चीज करायला हवे जाणीवपूर्वक प्रयत्न करून सर्व प्रतिबंध दूर करून शरीर काळाच्या मुखात जाण्यापूर्वी त्याचे सार्थक करायला हवे.

दुर्लभ मानवदेह.

बहुत जन्मांच्या सेवट। नरदेह सापडे अवचट।

माणसाला विवेकाची देणगी मिळाली आहे. सत्य-असत्य, शाश्वत-अशाश्वत, आत्मा-अनात्मा यांच्यातील योग्य निवडून चिरंतन सत्याचा शोध घ्यायला हवा; तरच जीवनाला अर्थ प्राप्त होईल. ऐहिक भोगाच्या मागे न धावता केवळ पूर्णतेचा ध्यास घ्यावा. पूर्णता हेच परमेश्वराचे रूप आहे. ते कसे प्राप्त करायचे हे भगवंत अर्जुनाला १५ व्या अध्यायात सांगत आहेत. (प्रश्न न विचारता) या अध्यायात भगवंतांनी आपले पूर्णस्वरूप प्रकट केले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

सच्चिदानंद परब्रह्म हेच शाश्वत आहे आणि दृश्यरूप असलेले नामरूपात्मक जगत मिथ्या आहे. जीव हाच परब्रह्मस्वरूप आहे. आणि हे अद्वैतज्ञान हेच सर्व शास्त्रांचे सार आहे.

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः ।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥

हे रहस्य या अध्यायात भगवंत प्रकट करतात आणि म्हणूनच हा अध्याय परिपूर्ण आहे. कलशाध्याय आहे.

अश्वत्थ वृक्षाचे रूपक —

प्रत्येक जीव — मी कर्ता, मी भोक्ता, सुखी-दुःखी संसारी, मर्त्य अशा कल्पनामध्ये बद्ध झाला आहे. मनानेच हे मोहजाल निर्माण केले आहे. या संसाराला वस्तुनिष्ठता नसून तो मानसिक आहे. प्रत्येक जीवाने अज्ञानाने केलेल्या या कल्पना आहेत. त्यामुळे त्याचे मन विषयाभिमुख बनते.

या विषयासक्तीमधून काही प्रमाणात तरी बाहेर येता यायला हवे. अंतर्मुख, विचारी व्हायला हवे. पूर्णता शोधण्यासाठी मन अनुकूल, संपन्न व्हायला हवे. एकाग्रता, रुचि वाढवता यायला हवी. मन एकाग्र व्हायला हवे.

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ॥

आसक्तीरहित, अंतर्मुख, शुद्ध, निर्मळ मन हेच खरे मोक्षाचे साधन आहे. ज्याचे मन ज्याच्याकडे आहे तोच मोक्षाचा अधिकारी आहे.

हे समजावून सांगताना अश्वत्थ वृक्षाचा रूपकात्मक उपयोग केला आहे.

अथ पञ्चदशोऽध्यायः ।

© www.madhaveeraghuveer.com